दैनिक

# विवेक सिंधु

बीड जिल्हा | शनिवार, दि.05 जूलै 2025 viveksindhu@gmail.com | वर्ष 45 वे | अंक क्र.84 | पाने 4 | किंमत : 2 रु. | WWW.Vivek Sindhu.com

## डोका गावात महिलेच्या घरात घुसून कोयता व तलवारीने हल्ला



बीड – तालुक्यातील डोका गावामध्ये एका महिलेच्या घरात घुसून तिच्यावर कोयता व तलवारीने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. यामध्ये महिला गंभीर जखमी झाली असून तिच्यावर स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचार सुरू आहेत. बबीता भांगे असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. तिच्या पतीच्या फिर्यादीवरून सात जणांवर केज पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जुन्या भांडणात झालेली केस मागे का घेत नाही? या कारणातून ही मारहाण झाल्याचे समोर आले आहे.

बीडच्या केज तालुक्यातील डोका येथे दि. 3 जुलै रोजी सकाळी सुनील भारत भांगे हे त्यांची म्हैस घराच्या समोर बांधत होते. यावेळी त्यांची मुलगी राजश्री यांना काहीजण हातात तलवार, कोयता, लोखंडी पाईप आणि दगड घेऊन आपल्या घराकडे येत असल्याचे दिसून आले. यानंतर सुनील भांगे हे घरी गेले असता विक्रम भागवत भांगे, सागर विक्रम भांगे आणि विशाल विक्रम भांगे हे कोयते व तलवार घेऊन त्यांना म्हणाले की, तुम्ही जुनी दाखल केलेली केस मागे का घेतली नाही? पुन्हा दोन दिवस अगोदर आमच्यावर का केस केली? असे म्हणून त्यांनी सुनीलची पत्नी बबीता भांगे हिच्यावर तलवारीने हल्ला केला. यात बबीता हिच्या दोन्ही खांद्याला गंभीर दुखापत झाली. यामुळे ती खाली पडली. त्यानंतर सुनीलचे वडील भरत भागवत भांगे हे धावून आले असता त्यांच्यावर पण हल्लेखोरांनी डोक्यात व उजव्या हाताच्या मनगटावर कोयत्याने हल्ला चढवला. हे पाहून मुलगी राजश्री ही आरडा ओरड करत असताना तिला देखील लोखंडी पाईपने मारहाण करण्यात आली.

या भांडणात महिलेसह चौघे जखमी झाले आहेत. गंभीर जखमी झालेल्या बबिता भांगे हिच्यावर अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद वैद्यकीय महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू असून महिलेची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळत आहे. या प्रकरणी सात जणांविरोधात केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

## जिल्ह्यात 37 (1) (3) लागू

बीड – बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी, यासाठी महाराष्ट्र पोलीस कायदा 37 (1) (3) कलम 07 जुलैच्या मध्यरात्रीपर्यंत लागू करण्यात आले आहे.

कोणताही मोर्चा, सभा, मिरवणुका व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका–यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकीस लागू राहणार नाही व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजुरीशिवाय 15 दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अंमलात राहणार नाही. तसेच या आदेशाचे पालन करुन कोणाताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका–यांची पूवर्मान्यता घेणे आवश्यक असेल असेही आदेशात अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी नमूद केले आहे.

# राज्यात मराठीच्या नावाखाली गुंडगिरी सहन केली जाणार नाही - मुख्यमंत्री

मुंबई – गेल्या काही दिवसांपासून राज्यात मराठी आणि हिंदी भाषेवरून चांगलाच वाद सुरु आहे. यातच मुंबईतील मिरा भाईंदरमध्ये मराठी बोलण्यावरून झालेल्या वादाचे तीव्र पडसाद उमटत आहेत. मीरा रोड येथील एका मिठाईच्या दुकानात मराठी बोलण्यास नकार दिल्याने वाद झाला आणि यावरून मनसेच्या कार्यकर्त्यांनी दुकानदाराला मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेच्या निषेधार्थ गुरुवारी व्यापारी संघटनांनी दुकाने बंद ठेवत मोर्चा काढत आंदोलन केलं आहे.

तसेच मनसेने आपली भूमिका ठाम असल्याचं सांगितलं. मुंबईत मराठी आणि अमराठीवरून झालेल्या वादावरून मुंबई महापालिका निवडणुकीआधीच चांगलंच राजकारण तापल्याचं पाहायला मिळत आहे. यावरून भाजपा आणि मनसे आमने–सामने आल्याचंही पाहायला मिळत आहे. यानंतर मनसेनेही मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे. दरम्यान, या वादावर आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया देत मनसेला मोठा इशारा दिला आहे.'मराठीच्या नावाखाली कोणी गुंडगिरी केली तर ते सहन केली जाणार नाही, योग्य ती कारवाई केली जाईल', असं देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं आहे.



"भाषेवरून मारहाण करणं हे अतिशय चुकीचं आहे. आम्ही मराठी आहोत, आम्हालाही मराठीचा अभिमान आहे. पण एखाद्या व्यावसायिकाला मराठी येत नाही म्हणून मारहाण करणं हे पूर्णपणे चुकीचं आहे. उद्या आपली अनेक मराठी भाषिक लोक वेगवेगळ्या राज्यात व्यवसाय करतात. त्यामधील आपल्या अनेक माणसांना तेथील भाषा येत नाही. मग त्यांच्याशी पण अशाच प्रकारे वागणूक मिळाली तर? भारतामध्ये अशा प्रकारची गुंडगिरी ही योग्य नाही. अशा प्रकारची गुंडगिरी कोणी केली तर त्यावर योग्य कारवाई केली जाईल", असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

"भाषेवरून कोणी मारहाण करत असेल तर हे सहन केलं जाणार नाही. ज्या प्रकारची घटना घडली आहे, त्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आणि कारावाई केली आहे. यापुढेही अशा प्रकारे भाषेवरून कोणी वाद केला तर त्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल. भारतातील कोणत्याही भाषेवर अशा प्रकारे अन्याय केला जाऊ शकत नाही, हे देखील आपल्याला लक्षात घ्यावं लागेल. हे लोक इंग्रजीला जवळ करतात आणि हिंदीवरून वाद करतात. मग हा कोणता विचार आहे? त्यामुळे अशा प्रकारे जे लोक कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करतील त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल", असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.

"राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी नक्कीच मेळावा घ्यावा, आम्ही घेतलेल्या निर्णयाचा त्यांना आनंद झालेला दिसत आहे. मात्र, त्या पाठिमागची भूमिका देखील त्यांनी लक्षात घेतली पाहिजे. एक समिती तयार करणे, त्या समितीत आपल्या एका नेत्याचा समावेश करणे, पहिलीपासून ते १२ वी पर्यंत हिंदीची सक्ती करणे आणि मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेणारे तेच, निर्णयावर सही करणारेही तेच आणि आता

▸ पान 3 वर

## बीडच्या शिवाजीनगर परिसरात वेश्याव्यवसायावर पोलिसांचा छापा

### दोन महिलांची सुटका, दोन आंटी अटकेत

बीड : स्थानिक गुन्हे शाखा व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष (AHTU) बीड यांच्या संयुक्त पथकाने शिवाजीनगर पोलिस ठाणे हद्दीतील तक्षशिला नगर परिसरात चालणाऱ्या वेश्याव्यवसायावर छापा टाकत दोन महिलांची सुटका केली. या कारवाईत दोन महिला एजंट्सना अटक करण्यात आली असून त्यांच्या विरोधात अनैतिक व्यापार प्रतिबंध कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. ३ जुलै २०२५ रोजी AHTU कक्षाला मिळालेल्या गोपनीय माहितीवरून ही कारवाई करण्यात आली. तक्षशिला नगर, धानोरा रोड



येथील भगवान विद्यालयाच्या मागील बाजूस काही महिला परराज्यातून महिला बोलावून वेश्याव्यवसाय करीत असल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आली. त्यानुसार, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या नेतृत्वाखाली डमी ग्राहकाच्या मदतीने सापळा रचण्यात आला.

डमी ग्राहकाने ठरल्याप्रमाणे १५०० रुपये देताच आशा पंडित गायकवाड (वय ४५, रा. सुभाष रोड, बीड) या महिला एजंटने वेश्याव्यवसायासाठी सहमती दर्शवली. पोलिसांनी तत्काळ छापा टाकून तिच्याकडून डमी ग्राहकाने दिलेल्या तीन नोटा पंचासमक्ष हस्तगत केल्या. यावेळी घटनास्थळी दोन पीडित महिला आढळून आल्या. त्यांच्याशी विश्वासात घेऊन केलेल्या चौकशीत, आरोपी आशा गायकवाड व तिची सहकारी कुशीवर्ता मोहन शिराळे (रा.

▸ पान 3 वर

## सहा मोटार सायकलसह आरोपी जेरबंद



बीड – मोटार सायकल चोरणार्‍या अट्टल चोराची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेने परळी रोड बार्शी नाका या भागातून सापळा लावून पकडले. या कारवाईत अनेक ठिकाणी मोटार सायकली चोरी केल्याच्या घटना उघडकीस आल्या असून तीन लाख 50 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

स्थानिक गुन्हे शाखेने जिवन रामदास गाडे, वय 24 वर्ष, रा बार्शी नाका,बीड यास चोरीची दुचाकीसह पोलीसांनी परळी रोड येथे सापळा लावुन पकडले. जीवन गाडे हा आरोपी पूर्वीपासून पोलीस रेकॉर्डवर होता .आरोपी जिवन रामदास गाडे यास

▸ पान 3 वर

# अंबाजोगाई तालुक्यातील शेतकऱ्यांना लागली उसाची गोडी

### तालुक्यात लागवड क्षेत्रात 4 हजार 500 हेक्टरची वाढ

अंबाजोगाई – कमी मेहनतीत ऊसच्या पिकात जास्त उत्पादन घेता यामुळे शेतकीर मोठ्या प्रमाणत ऊस लागवड करताता. परंतू २०२३ साली मॉन्सूनमध्ये कमी झालेला पाऊस, प्रकल्पांत अत्यल्प राहिलेला पाणीसाठा आदी कारणांमुळे तालुक्यातील ऊस क्षेत्रात मोठी घट झाली होती. तसेच, पाण्याअभावी उत्पादनातही घट येऊन मागील गळित हंगामात साखर उत्पादनालाही मोठा फटका बसला. मात्र, २०२४ मधील मॉन्सून काळात विक्रमी पाऊस झाला, त्यामुळे २०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये खरीपअखेर तालुक्यात जवळपास दुप्पट उसाची लागवड झाली आहे. त्यामुळे यंदा तालुक्यात साखर



उत्पादनात मोठी वाढ होण्याची चिन्हें आहेत.

अत्यल्प पावसामुळे २०२३ साली उसाच्या क्षेत्रात मोठी घट झाली होती. तालुक्यातील उसाचे सर्वसाधारण क्षेत्र गाळपाचा आणि नवीन लागवड असे मिळून ११ हजार ४०० हेक्टर इतके आहे. तालुक्यात मागील गळीत हंगामात सुमारे ६ हजार ९०० हेक्टरवर उसाची लागवड झालेली होती. ऊस क्षेत्र घटल्यामुळे मागील गळीत हंगामात जिल्ह्यातील साखर कारखान्यांना उसाचा मोठा तुटवडा जाणवला. त्यामुळे गाळप हंगाम अखेर मार्चमध्येच आटोपता घ्यावा लागला. २०२४ च्या तुलनेत २०२५ मध्ये साखर उत्पादन तब्बल ५५ टक्क्यांनी घटले. यामुळे साखर उत्पादनालाही मोठा फटका बसला. ऊस गाळपही कमी झाले. दरम्यान, मागील वर्षी मॉन्सून काळात तालुक्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला. परिणामी, कमी झालेली ऊस लागवड पुन्हा वाढण्यास मदत झाली. मागील वर्षी ६ हजार ९०० हेक्टरवर असलेले ऊस क्षेत्रात यंदा भर पडली आहे. म्हणजेच यंदा तब्बल ११ हजार ४०० हेक्टर उसाचे क्षेत्र झाले आहे. त्यामुळे येणाऱ्या गाळप हंगामात साखर कारखान्यांना उसाचा तुटवडा जाणवणार नसल्याची स्थिती आहे. तसेच, साखर उत्पादनातही मोठी वाढ होण्याची चिन्हे आहेत.

### • परीसरातील प्रमुख साखर कारखाने

परीसरात रांजणी येथील नॅचरल शुगर, आनंदगाव सारणी येथील येडेश्वरी, केज येथील गंगा माऊली असे प्रमुख साखर कारखाने आहेत. अंबा साखर कारखाना बंद असल्याने शेतकऱ्यांना आपला ऊस दुर कारखान्याला नेण्याची वेळ येते.

भाजपाचे युवा नेते अक्षय मुंदडा यांनी पानगाव येथील पनगेश्वर कारखाना ताब्यात घेतला आहे. अक्षय मुंदडा यांच्याकडे असलेल्या नेतृत्व क्षमतेमुळे या परीसरातील ऊस गाळपासाठी पानगावला जाऊ शकतो.

गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा उसाचे क्षेत्र वाढलेले आहे. मागील वर्षी सुमारे ६ हजार ९०० हेक्टरवर उसाचे क्षेत्र होते. यंदा नवीन लागवड ४ हजार अं५०० असे मिळून ११ हजार ४०० हेक्टर इतके आहे.

**– विजयकुमार पवार**
**(मंडळ कृषी अधिकारी, अंबाजोगाई)**

# स्वाराती वैद्यकीय रुग्णालयातील कॅन्सर विभाग पुन्हा सुरू करा

### मराठवाड्यातील जीर्ण विद्युत संरचना दुरुस्तीसाठी स्वतंत्र निधीची तरतूद करा ▸ आ. नमिता मुंदडा यांच्या अधिवेशनात आग्रही मागण्या

अंबाजोगाई : येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयातील अनेक वर्षांपूर्वी बंद पडलेला कर्करोग (कॅन्सर) विभाग पूर्ववत सुरू करण्यात यावा, तसेच संपूर्ण मराठवाडा विभागातील विद्युत दुरुस्ती व नुतनीकरणासाठी स्वतंत्र निधीची तरतूद करावी अशा ठाम मागण्या केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी राज्य विधीमंडळाच्या चालू अधिवेशनात केल्या आहेत.

राज्याच्या विविध भागांतील प्रलंबित प्रश्नांना न्याय मिळावा यासाठी विधीमंडळ अधिवेशनात आमदारांकडून मुद्दे प्रभावीपणे मांडले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर अंबाजोगाई येथील ग्रामीण भागातील रुग्णांना दिलासा मिळावा या उद्देशाने आ. मुंदडा यांनी कर्करोग विभागाची गरज अधोरेखित करत संबंधित मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली.

सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी या वैद्यकीय महाविद्यालयात कोट्यवधी रुपये खर्चून स्वतंत्र कॅन्सर विभाग उभारण्यात आला होता. काही काळ हा विभाग कार्यरत होता, मात्र तज्ज्ञ डॉक्टर व आवश्यक तंत्रज्ञांच्या अभावामुळे हा विभाग कालांतराने बंद करण्यात आला. अंबाजोगाईसह बीड आणि आजूबाजूच्या जिल्ह्यात कॅन्सर रुग्णांची संख्या मोठ्या




प्रमाणात वाढली आहे. मात्र स्वाराती रुग्णालयातील कर्करोग विभाग बंद असल्यामुळे आर्थिकदृष्ट्या कमकुवत रुग्णांना उपचारासाठी संभाजीनगर किंवा मुंबईसारख्या शहरांमध्ये धाव घ्यावी लागते. त्यामुळे रुग्ण व त्यांच्या कुटुंबियांना प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागतात, असे आ. मुंदडा यांनी सभागृहात स्पष्ट केले. या पार्श्वभूमीवर आ. नमिता मुंदडा यांनी रुग्णांची गैरसोय थांबवण्यासाठी आणि त्यांना स्थानिक पातळीवरच उपचार उपलब्ध व्हावेत म्हणून अंबाजोगाईतील कॅन्सर विभाग तातडीने सुरू करावा अशी आग्रही मागणी सभागृहात केली.

तसेच, परतीच्या पावसाच्या कालावधीत मराठवाड्यात दरवर्षी अतिवृष्टीसह वादळी वाऱ्यांचा मोठा फटका बसतो. या हवामानाच्या प्रतिकूल स्थितीमुळे अनेक ठिकाणी जुनी व जीर्ण झालेली विद्युत तारे तुटतात, विजेचे खांब कोसळतात व परिणामी मनुष्यहानीसह जनावरांच्या जीवाला धोका निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर आ. नमिता मुंदडा यांनी संपूर्ण मराठवाडा विभागातील विद्युत दुरुस्ती व नुतनीकरणासाठी तातडीने विशेष बैठक बोलावावी व यासाठी स्वतंत्र निधीची तरतूद करावी, अशी मागणी देखील अधिवेशनात केली आहे.

आ. मुंदडा यांनी केलेल्या या महत्वाच्या मागणीवर शासन सकारात्मक भूमिका घेणार का, याकडे मराठवाड्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# 'शिक्षक वास्तवात', समाजासाठी महत्त्वपूर्ण भूमिका निभावतो



बीड – वयोमानानुसार म्हणजे ५८ वर्ष पूर्ण झाले की या पवित्र अशा शिक्षण कार्यातून निवृत्त होत आहे. विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य करत असतो. मी नमन करते जिने मुलींसाठी शिक्षणाचे दारे उघडे केले सावित्रीबाई फुले, यांना व आभार मानते माझ्या आईवडिलांचे की मला त्यांनी त्या काळात शिक्षण दिले. शिक्षक, ही भूमिका माझ्यासाठी केवळ नोकरी नाही तर एक पवित्र कार्य आहे. विद्यार्थ्यांना शिकवता शिकवता खुप काही शिकले, त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य, आनंद व शिकण्याची उत्सुकता मला नेहमी च प्रेरणा देत असे. माझ्या विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन योग्य दिशा देणे आणि भविष्यासाठी तयार करणे हे माझे कर्तव्य समजते. मला अभिमान आहे की माझ्या आयुष्याचा एक मोठा भाग ज्ञान देण्यात आणि नवीन पिढी तयार करण्यात घालवला. माझ्या साठी सर्वात मोठा पुरस्कार , म्हणजे आज माझे विद्यार्थी विविध क्षेत्रात यश मिळवत आहेत. माझ्या आयुष्यातील सुंदर अध्याय म्हणजे अध्यापन यातून संस्कार, चारित्र्य, ज्ञान व्यक्तीमत्व विकास, याचे शिक्षण आणि पंख देण्याचा प्रयत्न केला.

माझे विदयार्थी माझी संपत्ती आहे. शिक्षकाचा हात धरून विद्यार्थी जीवनाचा मार्ग स्वीकार तात. शिक्षकाच्या कठोर परिश्रमामुळे विदयार्थ्यांच्या हदयात ज्ञानाची ज्योत प्रज्वलित होते. शिक्षणाच्या माध्यमातून समाज बदलण्याचा शिक्षकाचा एक छोटासा प्रयत्न आहे. देवाचे मी आभार मानते की मला शिक्षक होण्याची संधी दिली. शिक्षकाचे प्रेम आणि मार्गदर्शन विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वप्नांना शोधण्यासाठी मार्गदर्शक बनतात. मी म्हणेन शिक्षक की भूमिका सबसे पवित्र है,ज्ञान की ज्योती जलाने वाले हम है, । मला विश्वास आहे की मी दिलेली ज्ञानाची शिदोरी विद्यार्थी पुढे नेऊन समाजासाठी उपयोगी पडतील आज मी सेवानिवृत्त होत आहे. काही आठवणी अनुभव माझ्या सोबत राहतील. मला लाभलेले सर्व अधिकारीवर्ग, वेळोवेळी मला सहकार्य करणारे सहकारी तसेच विद्यार्थी, पालक,मला पाठिंबा देणाऱ्या व प्रोत्साहन देणारे माझे कुटुंब तसेच प्रहार संघटनेचे सर्व पदाधिकारी यांचे मी खूप खूप आभारी आहे व मनापासून धन्यवाद देते.

# 'अग्निशिखा' फुलली योगेश्वरीच्या प्रांगणात



अंबाजोगाई (प्रतिनिधी)– अंबाजोगाई येथील योगेश्वरी महाविद्यालयाने विकसित केलेल्या ग्रंथालयासमोरील बॉटनिकल गार्डनमध्ये सध्या अग्निशिखा ही दुर्मिळ वनस्पती फुलली आहे. ही वनस्पती विद्यार्थी, शिक्षक व महाविद्यालयात येणाऱ्या पालकांचे लक्ष वेधून घेत आहे. महाविद्यालयातील निसर्गप्रेमी प्राध्यापक सचिन कऱ्हाड यांनी याची माहिती दिली आहे. त्यांनी सांगितले की, ही लीली प्रजातीतील वेलवर्गीय वनस्पती असून ती आफ्रिका व आशिया खंडामध्ये आढळते. महाराष्ट्रात पश्चिम घाट, कोकण, सातपुडा, सातमाळ्याचे डोंगर या ठिकाणी सापडते. कंद हाताच्या बोटासारखी पांढरी गुळगुळीत असतात. महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ही वेल नक्की कोठे होती हे ओळखणे कठीण जाते कारण कंद सुप्तावस्थेत राहतो व पुढील पावसाळ्यात तो आपला जीवनक्रम पुन्हा सुरू करतो. याच्या पानाच्या रसाने उवा मरतात. सूज, व्रण, गंडमाळ ,अर्श ,कृमी ,काष्ठ, विषमज्वर इत्यादी आजारात तसेच विंचू व सर्पदंश कर्करोग व पोटाच्या विकारावर ही उपयुक्त आहे. गौरीचे हात म्हणून गौरी गणपतीला याची फुले वाहिली जातात. अलीकडच्या काळात या वनस्पतीचा वापर वेदनाशामक औषधांमध्ये मोठ्या प्रमाणावर होत असून याची मुळे व बिया औषधी बनवण्यात वापरल्या जात असल्यामुळे याचे उत्पादन कमी झाले आहे. यामुळे ही प्रजाती संकटग्रस्त वनस्पतींच्या यादीत समाविष्ट झाली आहे. ही दुर्मिळ वनस्पती पाहण्यासाठी निसर्ग प्रेमींनी योगेश्वरी महाविद्यालयास भेट देण्याचे आवाहन प्रा. सचिन कऱ्हाड यांनी केले आहे. वेगवेगळ्या नावाने ओळखली जाते या वनस्पतीच्या मुळाचा लेप बाळंतिणीला प्रसूतीच्या वेळी कळा आणण्यासाठी ओटीपोटावर लावण्यासाठी होत असल्याने तिला कळलावी असेही म्हणतात. याच्या फुलांच्या पाकळ्या अग्निज्वालाप्रमाणे दुरून समईत ज्योती तेवल्याप्रमाणे दिसतात म्हणून या वनस्पतीला अग्निशिखा असेही म्हणतात. कलहारी,गौरीचे हात, नखस्वामिका अशा नावांनी पण या वनस्पतीला ओळखतात. ही बहुवर्षायू वनस्पती भारतातील उष्ण कटिबंधातील जंगलात आढळते.

# गंगा माऊली शुगरचा मिल रोलर पूजन कार्यक्रम संपन्न



केज – केज शहरालगत असलेला गंगा माऊली शुगर कारखान्याचे मिल रोलर पूजन चेअरमन लक्ष्मणराव मोरे,युवा नेते आदित्य पाटील, व्हाईस चेअरमन हनुमंत मोरे,भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, गंगा माऊली शुगरचे संचालक प्रवीण मोरे, संचालक अविनाश मोरे,काँग्रेसचे युवा नेते पशुपतीनाथ दांगट, आप्पासाहेब ईखे,प्रविणकुमार शेप,बाळासाहेब ठोंबरे,मुन्ना ठोंबरे,कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी आय मुजावर,मुख्य शेतकी अधिकारी अविनाश आदनाक आदींच्या हस्ते रोलर पूजन झाले.

पुढील हंगाम गाळपासाठी पूजन कार्यक्रम घेऊन सुरुवात करण्यात आली. पुढील हंगामात साखर कारखाना गाळपाचा अधिकचा टप्पा पूर्ण करेल असे मत आदित्य पाटील यांनी बोलतांना व्यक्त केले.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना विश्वास आणि हमीभाव याबाबाबत आम्ही शब्दबद्ध आहोत.कॅपिसिटी वाढवण्यासाठी गतीने प्रयत्न सुरू आहेत असे मत हनुमंत काका मोरे यांनी व्यक्त केले. रोलर पूजन कार्यक्रमास परिसरातील नागरिक, कारखान्याचे कर्मचारी उपस्थित होते.

# शालेय सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धेला १७ जुलैपासून सुरवात

बीड – आंतरराष्ट्रीय सुब्रतो कप फुटबॉल स्पर्धेत आशियातील विविध देशांतील विद्यार्थी भाग घेतात, ज्यामुळे ही स्पर्धा शालेय स्तरावरील सर्वात उल्लेखनीय फुटबॉल स्पर्धा आहे. सन २०२५–२६ या वर्षात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड मार्फत जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे १७ ते १८ जुलै २०२५ या कालावधीत जिल्हास्तर शालेय सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेने २०२५–२६ मधील शालेय क्रीडा स्पर्धांची सुरुवात होणार आहे.

सदर स्पर्धा १५ वर्षा खालील मुले व १७ वर्षाखालील मुले व मुली या वयोगटात होत आहेत. १७ जुलै २०२५ रोजी १७ वर्षाखालील मुले व मुली तर १८ जुलै २०२५ रोजी १५ वर्षाखालील मुले या वयोगटातील स्पर्धा होतील. १७ वर्षाखालील वयोगटातील खेळाडूचा जन्म ०१ जानेवारी २००९ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा व १५ वर्षाखालील वयोगटातील खेळाडूचा जन्म ०१ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. स्पर्धेचे प्रवेश आणि प्रवेश शुल्क ऑफलाईन पद्धतीने १६ जुलै २०२५ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत स्वीकारले जाणार आहेत. स्पर्धेतील सामने जिल्हा क्रीडा संकुल, बीडच्या मैदानावर घेण्यात येणार आहेत. जिल्हास्तर स्पर्धे नंतर विभागस्तर आणि राज्यस्तर सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धा घेण्यात येणार आहेत. विभागस्तर शालेय सुब्रतो कप फुटबॉल स्पर्धा ह्या बीड येथे दि. २२ ते २४ जुलै २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल मैदान, बीड येथे होणार आहेत. विभागस्तर स्पर्धे तील वयोगटनिहाय विजयी संघांना राज्यस्तर स्पर्धेत प्रवेश मिळणार आहे.

जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागापूर्वीच ु.ीलीर्लीं. ळप या संकेतस्थळावर खेळाडू व संघाची नोंदणी करणे अनिवार्य आहे. तसेच प्रत्येक सहभागी संघानी रू. २०००/– प्रवेश फी भरलेल्या नोंदणीकृत संघांनाच या स्पर्धे त सहभागी करून घेण्यात येईल. राज्यस्तर स्पर्धेतील विजेत्या संघाला सुब्रतो मुखर्जी स्पोर्टस एज्युकेशन सोसायटीतर्फे आयोजित राष्ट्रीय स्पर्धे त सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. शालेय सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी क्रीडा अधिकारी कालिदासहोसूरकर ( मो.क्र.९४२१५९५५१५) यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

# मातृभूमी प्रतिष्ठान कडून मुख्याध्यापक कालिदास धपाटे सन्मानित



बीड – तालुक्यातील नामलगाव फाटा येथील लक्ष्मणराव जाहेर पाटील माध्यमिक विद्यालयाचे आदर्श मुख्याध्यापक कालिदास धपाटे यांचा सेवापुर्ती सोहळा मंगळवार दि.१ जुलै २०२५ रोजी मराठवाडा शिक्षक संघ यांच्या वतीने यशवंत विद्यालय कॅनाल रोड , बीड येथे विविध सामाजिक ,शैक्षणिक समस्यावर तज्ञ व्यक्तींच्या सविस्तर मार्गदर्शनाने मोठ्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला. यावेळी मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे, मातोश्री विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब नागरगोजे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी मुख्याध्यापक राजकुमार कदम, गणेश वाघ, दत्तात्रय चव्हाण, प्राचार्य डी जी तांदळे, उत्तमराव सानप, नामदेव चव्हाण, बाबा बडे, जे एम पैठणे, गणेश आजबे, युवराज मुरुमकर ,बीड शहर बचाव मंच चे अध्यक्ष नितीन जायभाये , लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे आदींसह बीड शहर बचाव मंच, लक्ष्मणराव जाहेर पाटील माध्यमिक विद्यालय व मराठवाडा शिक्षक संघाचे विविध पदाधिकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व सामाजिक कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

## वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरी

बीड– प्रख्यात कृषीतज्ञ, प्रगतशील शेतकरी, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी सर्वाधिक काळ विराजमान राहत महाराष्ट्राला शेती क्षेत्रात यशस्वीरित्या अग्रेसर स्थानी आणण्याकरता सातत्याने प्रयत्नशील राहिलेल्या, वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त ,स्वातंत्र्य सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालयामध्ये त्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी वसंतराव नाईक यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकताना महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष, माजी आमदार राजेंद्र जगताप म्हणाले की, भारताचे माजी उपपंतप्रधान व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांची केंद्रात संरक्षण मंत्रीपदी निवड झाल्यानंतर महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदाची जबाबदारी ज्यांना दिली गेली त्या वसंतराव नाईक यांनी त्यांच्या कार्यकाळात महाराष्ट्राला शेती क्षेत्रात अभूतपूर्व अशी प्रगती साध्य करण्याकरता अहोरात्र प्रयत्न केले. कृषीसंस्कृतीचे पुनरूत्थान करीत वसंतराव नाईकांनी देशभरात नावलौकिक मिळविला. आधुनिक भारतीय शेती आणि शेतकऱ्यांचा त्यांनी मान उंचाविला. 'आधुनिक कृषीप्रधान भारताचे कृषीसंत' या शब्दात प्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत एकनाथराव पवार यांनी वसंतराव नाईक यांचे वर्णन केले आहे, ते नक्कीच सार्थ आहे. इ.स. १९७२ मधील महाराष्ट्रातील भीषण दुष्काळादरम्यान त्यांनी शेतकऱ्यांसाठी मदतीच्या दूरगामी योजना राबवल्या. पुढे बोलतांना राजेंद्र जगताप म्हणाले की महानायक वसंतराव नाईक यांना केवळ शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाणीव असल्याने त्यांनी त्या बाबत दूरगामी स्वरुपाच्या उपाययोजना केल्या. शेती आणि शेतकऱ्यांशी त्यांची नाळ कायम जुळलेली होती. कठीण काळातही क्रांतीकारी कार्य नाईकांनी केले.

महानायक वसंतराव नाईक हे एक नाव नसून शाश्वत विकासाची लोकाभिमुख विचारधारा आहे. या अभिवादन प्रसंगी माजी आमदार जनार्दन तुपे, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शाहिस्ता इनामदार, सर्व प्राध्यापक आणि विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# योगेश्वरी नूतन प्रा. विद्यालयात ऑक्सिजन पार्कची निर्मिती

**कार्यानुभवाच्या तासिकेचा उपयोग वृक्षारोपणासाठी**



अंबाजोगाई (प्रतिनिधी)– येथील दे.बा. गणगे योगेश्वरी प्रा.विद्यालय (स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय परिसर) येथे योगेश्वरी शिक्षण संस्था निसर्ग संवर्धन मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी परिसरात वृक्षारोपण करून परिसरामध्ये ऑक्सिजन पार्कची निर्मिती केली आहे विशेष म्हणजे विद्यालयात होणाऱ्या कार्यानुभवाच्या तासिकेचा उपयोग वृक्ष रोपण, संवर्धनासाठी होत आहे. शालेय वयातच विद्यार्थ्यांवर श्रमदानाचे संस्कार व्हावेत व सामाजिक बांधिलकी म्हणून त्यांनी त्यामध्ये सहभाग घ्यावा या उद्देशाने संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांच्या संकल्पनेतून निसर्ग संवर्धन मंडळाची स्थापना करण्यात आली. निसर्ग संवर्धन मंडळात संस्था उपाध्यक्ष गणपत व्यास, कार्यकारी उपाध्यक्ष एड.जगदीश चौसाळकर, संस्था सचिव कमलाकर चौसाळकर,कोषाध्यक्ष शैलेश वैद्य, ज्येष्ठ सल्लागार प्रा. माणिकराव लोमटे, एन. के.गोळेगावकर, संचालक लंकेश वैद्य,सय्यद पाशुमियाँ आदींचा सक्रिय सहभाग व विशेष मार्गदर्शन लाभत आहे. निसर्ग संवर्धन मंडळाच्या माध्यमातून संस्थेच्या सर्व विभागात वृक्षारोपण करण्याचा संकल्प असून मेडिकल परिसरातून उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी ५१ वृक्ष भेट देण्यात आली कार्यानुभवाच्या तासिकेचा उपयोग विद्यार्थी,शिक्षक यांच्या परिश्रमाने वृक्षारोपण करून ऑक्सिजन पार्कची निर्मिती केली आहे. संस्था पदाधिकारी,शालेय पदाधिकारी,निसर्ग संवर्धन मंडळ आदींच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण प्रमुख रविंद्र ठाकूर,उपप्रमुख अशोक आखाडे,इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विशेष परिश्रम घेत आहेत.

हे पत्रक संपादक, मुद्रक, मालक व प्रकाशक अभिजीत नानासाहेब जगताप यांनी योगेश्वरी मुद्रणालय, अंबाजोगाई येथे छापून दैनिक विवेक सिंधु कार्यालय, नगर परिषद व्यापारी संकुल (संकुल क्र.४३,४४) अंबाजोगाई पिन–४३१५१७ जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले आहे. संस्थापक संपादक – प्रा.नानासाहेब गाठाळ ✻ संपादक– अभिजीत जगताप ✻ वृत्तपत्राचा नोंदणी क्र.६५७८८/८५ ✻ फोन–२४७२७०, मो :–९७६४०३३१११,९७६५५०००८८

दैनिक विवेक सिंधु
शनिवार, दि.०५ जूलै २०२५ पान ४

## अल्पवयीन मुलीचे अपहरण

केज – एका अल्पवयीन मुलीला अज्ञात व्यक्तीने पळवून नेल्याची घटना केज तालुक्यातील एका गावात उघडकीस आली. याप्रकरणी युसुफवडगाव पोलिसात अपहरणाचा गुन्हा दाखल झाला आहे. केज तालुक्यातील एका गावातील १६ वर्षे ११ महिने १६ दिवस वयाच्या मुलीसह तिच्या घरातील सर्व जण २ जुलै रोजी रात्री ११.३० वाजता झोपले. त्यानंतर या अल्पवयीन मुलगी घरात दिसून न आल्याने तिचा नातेवाईकांसह इतरत्र शोध घेतला असता तिचा तपास लागला नाही. शेवटी आपल्या मुलीस अज्ञात व्यक्तीने पळवून नेल्याची तक्रार तिच्या आईने युसुफवडगाव पोलिसात दिली. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे हे करीत आहेत.

## नामस्मरणातून यशाच्या शिखरापर्यंत पोचलेले ह.भ.प.योगेश महाराज घोलप

बीड – संतांची भूमी, भक्तीचा वारसा लाभलेली... बीड जिल्ह्यातील तळेगाव या छोट्याशा गावात जन्मलेला एक तेजस्वी, संतवाणीने झपाटलेला चेहरा –तो म्हणजेच ह.भ.प. योगेश महाराज घोलप. अत्यंत लहान वयातच कीर्तनाची गोडी लागलेली, आणि ती गोडी केवळ आवड नव्हे तर एक

पान ३ वर

## कोदरीत किराणा दुकानातून २ हजाराचा गुटखा पकडला

केज – कोदरी (ता. अंबाजोगाई) येथील दत्तु रावसाहेब तिगुले हा त्याच्या राजमुद्रा किराणा दुकानातून गुटखा पानमसाला विक्री करीत असल्याची माहिती मिळताच युसुफवडगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या आदेशावरून सहाय्यक फौजदार अमजद सय्यद, जमादार संपत शेंडगे, पोलीस नाईक सुरेश गित्ते यांच्या पथकाने ३ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजता छापा मारला. दुकानाची झडती घेतली असता दुकानाच्या काउंटरच्या बाजूला पांढऱ्या पोत्यात राजनिवास सुगंधी मसालाचे आठ पुडे व प्रिमियम आर एन– ०१ जाफरानी जर्दाचे आठ पुडे आढळून आल्याने पोलिसांनी हा दोन हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलीस नाईक सुरेश गित्ते यांच्या फिर्यादीवरून दत्तु तिगुले विरुद्ध युसुफवडगाव पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. तपास सहाय्यक फौजदार अमजद सय्यद हे करीत आहेत.

# खा.बजरंग सोनवणेंच्या वाढदिवसानिमीत्त जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची होणार आरोग्य तपासणी

### राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, जिल्हा शल्यचिकित्सक यांचे वैद्यकिय अधिक्षकांना पत्र

बीड: बीडचे खा.बजरंग सोनवणे यांचा वाढदिवस दि.६ जुलै रोजी जिल्हाभरात विविध कार्यक्रमांनी साजरा केला जात आहे. तालुकास्तरावर राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने रक्तदान शिबीरांचे आयोजन केले आहे. दरम्यान, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत अंगणवाडी ते बारावीपर्यंत विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी केली जाणार आहे.



खा.बजरंग सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्याबाबत डॉ.संजय राऊत, जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा रूग्णालय बीड यांनी सर्व वैद्यकिय अधिक्षकांना याबाबत पत्र दिले आहे.

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी करयात येते. यामध्ये ० ते ६ वर्षे वयोगटातील अंगणवाडीमध्ये जाणाऱ्या बालकांची वर्षातून २ वेळा तर शासकीय आणि निमशासकीय शाळांमधील ६ ते १८ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांची वर्षातून एकदा आरोग्य तपासणी करण्यात येते. दरम्यान, दि.६ जुलै रोजी खा.बजरंग सोनवणे यांच्या वाढदिवसानिमीत्त संपूर्ण बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुका स्तरावर विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीने वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे. त्यासाठी शिक्षण विभागाशी संपर्क करण्यात येत असून संबंधीत शाळेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याबाबत जनजागृती करावी, असेही डॉ.संजय राऊत, जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय, यांनी म्हटले आहे. दरम्यान, यासाठी तालुकास्तरावर नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. वैद्यकिय अधिक्षक, सर्व जिल्हा/ उप जिल्हा/ ग्रामिण रुग्णालय, यांना पत्र पाठवून

पान ३ वर

## माजलगावच्या मराठवाडा साहित्य परिषद शाखेच्या नूतन कार्यकारिणीची एकमताने निवड



माजलगाव – येथील मराठवाडा साहित्य परिषद शाखेच्या नूतन कार्यकारिणीची निवड एकमताने मंगळवारी (दि.२) करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी प्रा. डॉ. भाऊसाहेब राठोड , उपाध्यक्षपदी प्रा. स्नेहल पाठक, कार्यवाहपदी किशोर गुंजकर, तर कोषाध्यक्षपदी बालासाहेब झोडगे यांची निवड करण्यात आली.

उर्वरित कार्यकारिणी मध्ये मुकुंदराज सोळंके, प्रा.डॉ. उमेश साडेगावकर, हिरामण डावरे, पुरुषोत्तम जाधव, डॉ. अंगद गायकवाड, शरद रांजवण, खेलबा काळे, विशाल वायाळ, प्रा. संगीता जाधव, गौरी सुहास देशमुख, डॉ .प्रज्ञा जोशी यांची निवड करण्यात आली. माजलगावची मराठवाडा साहित्य परिषदेची शाखा ही गतिमान शाखा म्हणून महाराष्ट्रात ओळखली जाते. एक दिवस मराठीचा आणि शिवार साहित्य संमेलन हे या साहित्य परिषदेचे महत्त्वाचे उपक्रम आहेत. वाचन संस्कृती वाढवणे व नवोदित साहित्यिकांना व्यासपीठ

पान ३ वर

# वाळू घेऊन जाणारा ट्रॅक्टर, ट्रक पकडला

### ग्रामीण पोलिसांची कारवाई

बीड – पाली शिवारातून ट्रॅक्टरमध्ये वाळू जात असल्याची माहिती बीड ग्रामीण पोलिसांना झाल्यानंतर पोलिसांनी सदरील ट्रॅक्टर पकडून ट्रॅक्टरसह वाळू जप्त केली आहे. त्याचबरोबर एका ट्रकमध्ये वाळू जात असल्यानेसदरील ट्रकही पकडण्यात आला. पाली शिवारातून एका ट्रॅक्टरमध्ये अनाधिकृत वाळू जात असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक दराडे यांना झाल्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली सतीश मुंडे, आतिष मोराळे, नामदेव सानप या कर्मचाऱ्यांनी ट्रॅक्टर पकडला.





या ट्रॉलीमध्ये वाळू आढळून आली. वाळुसह ट्रॅक्टर जप्त करण्यात आला. ट्रॅक्टरसह अन्य एक ट्रकही पकडण्यात आला. ट्रक क्र. एम.एच. १४ ई. एम. ७६७७ हा ताब्यात घेण्यात आला. ट्रक जप्त करण्यात आला आहे. दोन्ही वाहनांविरोधात कारवाई करण्यात आली.

## ट्रकमधून शेंगदाण्याचे कट्टे लांबविले

केज – मांजरसुंबा रस्त्यावरील टोलनाक्याजवळ चालत्या ट्रकवर चढून अज्ञात चोरट्यांनी २६ हजार पाचशे रुपयांचे शेंगदाण्याचे ५ कट्टे लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी केज पोलिसात चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे.

राजस्थान राज्यातील बिरामसर (ता. नौका जि. बिकानेर) येथील ट्रक चालक – मालक छगनलाल मोहनलाल चौधरी हे बिकानेर येथून ४०० शेंगदाणा कट्टे ट्रकमध्ये (आर. जे. ०७ जी. बी. ३८१७) भरून लातूरकडे निघाले होते. ३ जुलै रोजी सकाळी ७ वाजता मांजरसुब्याकडून केज मार्गे लातूरकडे जात असताना उमरी फाट्याजवळील टोलनाक्याजवळ अज्ञात चोरट्यांनी चालत्या ट्रकवर चढून ताडपत्री फाडून ट्रकमधील २६ हजार पाचशे रुपयांचे शेंगदाण्याचे ५ कट्टे लंपास केले. ट्रक चालक छगनलाल चौधरी यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध केज पोलिसात चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे. तपास जमादार फुलचंद सानप हे करीत आहेत.

## विज्ञान शिक्षक आणि प्रयोगशाळा सहाय्यक यांच्यासाठीची कार्यशाळा उत्साहात

अंबाजोगाई(प्रतिनिधी) – मराठी विज्ञान परिषद मुंबई,पू.बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्र आणि मराठी विज्ञान परिषद अंबाजोगाई विभाग व गटशिक्षण कार्यालय अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्रात विज्ञान शिक्षक आणि प्रयोगशाळा सहाय्यक यांच्यासाठी प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली कार्यशाळा उदघाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यो. शि. संस्थेचे व म.वि. परिषदेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून गट शिक्षणाधिकारी मधुकर सुवर्णकार,मराठी विज्ञान परिषदेचे व्यवस्थापकीय संचालक राजेश समेळ, योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर, मराठी विज्ञान परिषदेचे सचिव प्रा.भीमाशंकर शेटे,योगेश्वरी महाविद्यालयाचे प्राचार्य एम.व्ही. डॉ.एम.व्ही. कानेटकर,प्रा.ए.पी. नरसिंगे आदी उपस्थित होते.

विज्ञान विषयात रुची असणाऱ्यासाठी म.वि. परिषदेच्या वतीने वारंवार विविध उपक्रम होतात. त्यात भाग घेऊन काम करण्यासाठी मराठी विज्ञान परिषद नेहमीच पुढाकार घेत असते असे मत उपस्थित पाहुण्यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात विज्ञान परिषदेच्या वतीने अभ्यासक तज्ञ व्यक्तिचे मार्गदर्शन होते विज्ञान शिक्षक व सहाय्यक यांच्यासाठी हे शिबीर महत्वाचे असल्याचे मत चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रास्तविकातून म.वि. परिषदेच्या अंबाजोगाई शाखेचे सचिव प्रा.भीमाशंकर शेटे यांनी विज्ञान शिक्षक,प्रयोग शाळा सहाय्यक यांच्या कार्यशाळा आयोजना मागची भुमिका प्रास्तविकातून मांडली.

पान ३ वर

## बीड जिल्ह्यात काँग्रेसकडून नविन तालुका अध्यक्षांच्या निवडी जाहीर

### जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनाही प्रभारी वरून कायम अध्यक्ष

केज – बीड जिल्हा काँग्रेसच्या वतीने सर्वच तालुका अध्यक्षांच्या नियुक्तया करण्यात आल्या असून बीड जिल्हा काँग्रेसने आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून तयारी सुरू केली असल्याचे यावेळी सांगितले. या नियुक्तया काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या खा. रजनीताई पाटील यांच्या सूचनेवरून व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री अशोक पाटील, आदित्य पाटील, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे, पशुपतीनाथ दांगट, प्रवीनकुमार शेप, गणेश राऊत आदींच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्ती पत्र देण्यात आले.



केज तालुका अध्यक्ष पदी श्री. प्रविण लक्ष्मण खोडसे,बीड ग्रामीणश्री. गणेश आसाराम बजगुडे, परळी वैजनाथ ग्रामीण,ॲड. प्रकाश बापूराव मुंडे,परळी वैजनाथ शहर,श्री. हानिफ करीम सय्यद,अंबेजोगाई ग्रामीण अभिजीत व्यंकटराव लोमटे,आष्टी श्री. फारोक मोहम्मद सय्यद, पाटोदा श्री. राहुल शाहुराव जाधव, माजलगांव श्री. नारायण लक्ष्मण होके पाटील, धारूर श्री. सिध्देश्वर देवराव रणदिवे, गेवराई श्री. महेश गणेश बेद्रे, अंबाजोगाई शहर श्री. मोहमद असिफोद्दीन सइदोद्दीन खतीब बीड शहर श्री. परवेज अहमद बशिरोद्दीन कुरेशी, शिरूर कासार भास्कर बुवासाहेब केदार, माजलगाव

पान ३ वर

## घारगाव रस्त्याच्या दुरवस्थेमुळे शेतकऱ्यांची मोठी अडचण

### गाय गाळात अडकली, ८ तासांनंतर सुटका; रस्ता दुरूस्त करण्याची गावकऱ्यांची मागणी

घारगाव – मौजे घारगाव ते लिंबागणेश या शिव रस्त्याची दुरवस्था आणि दुरुस्ती अभावी शेतकर्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या निकृष्ट रस्त्यामुळे नुकतीच एक गंभीर घटना घडली आहे. शेतकरी भालचंद्र माणिकराव ढास यांच्या मालकीची गाय चिखलात अडकली आणि तब्बल आठ ते नऊ तास गाळात फसून राहिली.

रस्ता खराब असल्यामुळे शेतात जाणे कठीण झाले असून, याच पार्श्वभूमीवर सदर घटना घडली. ढास दांपत्य आपल्या गायीसह शेतात गेले होते. रात्रीच्या वेळेस गाय अचानक चिखलात फसली. अंधारामुळे व रस्त्याच्या अडचणीमुळे कुणालाही कल्पना येऊ शकली नाही. शेतकरी आणि गाय घरी परत न आल्याने त्यांच्या घरच्यांनी शोध घेतला असता ही बाब उघड झाली. भालचंद्र ढास आणि त्यांच्या पत्नीने गायीला बाहेर काढण्याचा खूप प्रयत्न केला, मात्र गाळ घट्ट झाल्यामुळे त्यांना यश आले नाही. अखेर त्यांनी गावातल्या काही लोकांना मदतीसाठी बोलावले. गावकर्यांनी धाव घेत गायीची सुटका केली. गायीला गाळातून बाहेर काढण्यासाठी तब्बल आठ तास लागले. या सार्या घटनेने ढास कुटुंबाला मोठा मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागला. ही घटना ऐकून गावकर्यांनी संताप व्यक्त केला असून घारगाव ते लिंबागणेश रस्त्याच्या तातडीने दुरुस्तीची मागणी केली आहे.

हा रस्ता आमच्या शेतीसाठी अत्यावश्यक आहे. मात्र अनेक वर्षांपासून दुर्लक्षित आहे. पावसाळ्यात तर या रस्त्याची अवस्था अत्यंत वाईट होते. जनावरं, शेतकरी आणि वाहनधारक सगळेच अडचणीत येतात. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. सदर घटना प्रशासनाला डोळे उघडणारी ठरावी अशी अपेक्षा गावकर्यांनी व्यक्त केली आहे.

सदरील गाय गंभीर असून, ती शेवटच्या घटका मोजत आहे. यामुळे दुभती गाय मरणाच्या दारावर असल्याने शेतकर्याचे नुकसान झाले आहे. प्रशासनाने याचा पंचनामा करुन नुकसान भरपाई द्यावी अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

## अंकुर प्रतिष्ठानच्या वतीने मोफत रोगनिदान शिबिर; ५६ रूग्णांची तपासणी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)– अंकुर प्रतिष्ठान व संशोधन संस्था यांच्या वतीने आयोजित मोफत रोग निदान शिबीरात रुग्णांची तपासणी करण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ धाट,प्रा. अशोक पत्की, समन्वयक सुधीर धर्माधिकारी, माणिकराव बावणे,माजी शिक्षण सभापती राजेसाहेब देशमुख,डॉ. अतुल देशपांडे,डॉ.कौस्तुभ कुलकर्णी,डॉ.ओंकार ताथोडे आदी उपस्थित होते. यावेळी डॉ.अतुल देशपांडे म्हणाले




की,मोफत शिबिरामुळे गरजु रूग्णांना फायदा होतो. अंकुर प्रतिष्ठानने यापुढे ही उपक्रम करावा असे आवाहन केले.पुढील मासिक मोफत रोगनिदान शिबिरात मुंबईचे सुप्रसिद्ध सर्जन पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने उपस्थित राहतील शिबीरासाठी लागणारी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन राजेसाहेब देशमुख यांनी दिले व सेवानिवृत्त प्राचार्य राजाभाऊ धाट यांच्या मुळेच मी घडल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेचे विश्वस्त सेवानिवृत्त प्राचार्य अशोक पत्की यांनी राजेसाहेब देशमुख यांचा व माणिकराव बावणे यांचा संस्थेचे समन्वयक सुधीर

पान ३ वर